# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. महादेव सिद्राम माळी,<br>मु. पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. महादेव सिद्राम माळी, मु. पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी गट क्र. ९३ मध्ये ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५००/– + रु. १५००/– = रु.४०००/– पावती क्र. ५३२५४५७ दि. २७.१.२०१० नुसार भरलेले आहेत. आजतागायत वीज पुरवठा मिळालेला नाही. आदेश देताच चाचणी अहवाल देण्याची तयारी दर्शविली आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ७७० दि. ३०.१.२०१० नोंदविली. परंतु अंतर्गत कक्षाने दि. २९.६.२०१० पर्यंत आदेश दिले नाही म्हणून परिशिष्ट अ मध्ये दि. २९.६.२०१० ला तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत विनंती केल्याप्रमाणे कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विद्युत पुरवठा मिळावा. अंतर्गत कक्षाने मुदतीत आदेश पारित न केल्याने ग्राहकास मंचाकडे दाद मागावी लागत आहे, ज्यामुळे सर्व यंत्रणेला व ग्राहकाला त्रास सोसावा लागत आहे व ही कृती विनियमा विपरीत आहे याची गंभीर जाणीव द्यावी.

वितरण कंपनीने आपल्या दि.२४.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दिनांक २७.१.२०१० ला पैंसे भरल्याचे मान्य केले व दि. ४.५.२०१० ला चाचणी अहवाल दिला आहे. ०.२४ कि मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे, त्यांना वीज जोडणी दि. ३.८.२०१० पूर्वी देण्यात येत आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचामध्ये दि. २८.७.२०१० ला सुनावणीस घेतली असता, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता श्री. भोसले व सहाय्यक अभियंता श्री. राखे उपस्थित.

उभयबाजूंनी तक्रारदार यांनी विद्युत पुरवठ्यासाठी रु. २५००/- + रु. १५००/- = रु.४०००/- भरल्याचे मान्य केले आहे. त्यांना अद्याप विद्युत पुरवठा मिळाला नाही हे मान्य आहे तक्रारदाराने मंचासमोर आदेश देताच चाचणी अहवाल देत आहे असे सांगितले. या उलट, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तक्रारदाराने दि. ४.५.२०१० ला चाचणी अहवाल दिला आहे असे म्हटले आहे. त्यामुळे तक्रारीतील सत्यतेबाबत संशय निर्माण होतो. यामुळे तक्रार प्रतिनिधी मार्फत दाखल करण्यात आली असल्याने त्यांना कांही गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे. चाचणी अहवाल दिल्यानंतर जवळजवळ १ महिना २५ दिवसांनी तक्रार दाखल केली आहे. चाचणी अहवाल देत आहोत असे म्हटले आहे, त्यामुळे सत्य बाजू मंचासमोर सांगितली जात नाही असे दिसून आले आहे. वि.प.ने लेखी अहवालात ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण करुन तक्रारदारास दि. ३.८.२०१० पूर्वी कनेक्शन देत आहोत असे सांगितले आहे. त्यामुळे तक्रारदाराची विनंती विद्युत पुरवठा मिळावा मान्य करण्यात आली आहे, परंतु कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही नाही हे दिसते. अर्थात तक्रारदार यांनी लेखी अथवा तोंडी मंचासमोर भरपाईची मागणी केलेली नाही, त्याबद्दलचा हक्क राखून ठेवला / सोडून दिला हे तपासणे आवश्यक आहे.

वि.प.ने मंचासमोर दि. ३.८.२०१० ला वीज जोडणी देत असल्याचे लेखी नमूद केल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) वितरण कंपनीने आपल्या दि. २४.७.२०१० लेखी अहवालात नमूद केल्याप्रमाणे दि. ३.८.२०१० रोजी वीज पुरवठा जोडून देत असल्याची हमी दिली असल्याने तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष